# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.८ (                    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाअंतर्गत केमिकल टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित मुलाखतीमध्ये ऑनलाईन मुलाखतीत तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

युनिर्व्हसिटी इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथील विद्यार्थ्यासाठी शापूर्जी पलोनजी ॲडव्हॉन्स इंजिनियरींग मटेरियल्स या नामांकित कंपनी तर्फे मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामधून बी.टेक. प्लॅास्टीक आणि एम.टेक केमिकल इंजिनियरींचे नील गोडबोले, आशुतोष क्षत्रिय (एम.टेक केमिकल इंजि.) आणि शुभम चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मा.कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र.कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा.किशोर पवार, संचालक प्रा.जे.बी.नाईक, प्लॅास्टीक विभागाचे प्रमुख डॉ.जे.एस.नारखेडे, समन्वयक प्रा.रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ.उज्वल पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

**बातमी क्र.०२**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडे आव्हान-२०२२ चान्स्लर बिग्रेड राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर आयोजनाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मा.कुलपती कार्यालयाकडून नियुक्त् अभ्यास व सर्व्हे उपसमिती समन्वयक डॉ. संजय चाकणे (प्राचार्य,इंदापूर महाविद्यालय) यांच्या समितीने गुरुवार दि.७ जुलै रोजी विद्यापीठात पाहणी केली.

या अभ्यास समितीमध्ये रामटेक येथील कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.रामचंद्र जोशी आणि एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठाचे विद्यार्थी विकास संचालक डॉ.नितीन प्रभु तेंडुलकर हे होते. या समितीने विद्यापीठातील साधन-सामुग्री व उपलब्ध् परिसर जलतरण तलाव, सभागृह, निवास व्यवस्था आदीची पाहणी केली. तदनंतर या समिती सोबत कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्र.कुलसचिव किशोर पवार, प्र. वित्त् व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल हे उपस्थित होते. या बैठकीत आव्हान-२०२२ शिबिराचे आयोजन सुनियोजित होण्यासाठी रुपरेषा ठरविण्यात आली अशी माहिती राष्ट्रीय सेवायोजनेचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी दिली.

---

जा.क्र. :- कबोचौउमवि/१६/बातमी-सीटीपीसी/हस्तदेय/२०२२                    दिनांक : ८ जुलै,२०२२

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त् बातमी आपल्या जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी यांच्याकरीता